# मुंबई मेट्रो रेल दोन आठवड्यात उभारणार १०५० बेडचे हॉस्पिटल

## रुग्ण संख्येत दिवसेंदिवस वाढ : बेडची गरज भासत असल्याचे चित्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात दिवसेंदिवस कोरोनाच्या रुग्ण संख्येत वाढ होत असल्याने आता बेडची कतरता भासत आहे. ही कमतरता भरून काढण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) सरसावली आहे. एमएमआरसीएलतर्फे येत्या दोन आठवड्यात मुंबईतील दहिसर आणि बोरीवलीमध्ये १०५० बेडचे हॉस्पिटल उभारण्यात येणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून मुंबईमध्ये कोरोनाच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. या रुग्णांवर उपचार करण्यासाठी बेडची गरज भासत असल्याने एमएमआरडीए, म्हाडा, महापालिका पुढे सरसावत हॉस्पिटल बांधत आहेत. याप्रमाणे आता एमएमआरसीएलनेही पुढाकार घेत दोन कोविड दक्षता सुविधा केंद्रांची उभारणी सुरु केली आहे.



### दक्षता केंद्र उभारणार

- खूप वेगाने कोरोनाचा प्रसार होत असल्याने मुंबईतील हॉस्पिटलमधील बेडची कमतरता भासत असल्याने कोविड दक्षता सुविधा केंद्रांची उभारणी करण्याचा निर्णय एमएमआरसीएलनेही घेतला. दोन कोविड दक्षता सुविधा केंद्रांची उभारणी होणार आहे.

खूप वेगाने कोरोनाचा प्रसार होत असल्याने मुंबईतील हॉस्पिटलमधील बेडची कमतरता भासत असल्याने कोविड दक्षता सुविधा केंद्रांची उभारणी करण्याचा निर्णय एमएमआरसीएलनेही घेतला. एमएमआरसीएलद्वारे दोन कोविड दक्षता सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात येत असून यापैकी एक आठशे बेडचे अलगिकरण केंद्र दहिसर चेक नाका परिसरात उभारण्यात येत आहे.

याठिकाणी ऑक्सिजनचा पुरवठा करणारे दोनशे ऑक्सिजनीटेड बेड देखील उपलब्ध असतील. यासह कंदर पाडा, बोरिवली आरटीओ कार्यालयाजवळ अडीचशे बेडचे कक्ष उभारण्यात येईल. येथे हाय डिपेंन्डसी युनिट (एचडीयु) तसेच डायलिसिसची सुविधा असणारा अतिदक्षता विभाग देखील असणार आहे. या दोन्ही केंद्रांचे काम युद्ध पातळीवर सुरु असून दोन आठवड्याच्या आत हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.